पोलीस उप आयुक्त (मुख्यालय),
मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय
कार्यालयाचा पत्ता-सेक्टर ५, रामनगर, शांतीगार्डन, मिरा-रोड (पुर्व),
ठाणे.४०११०७ फोन नंबर-०२२-२९४५१००
E-mail:-dcphq.mb-vv@mahapolice.gov.in

जा.क्र.- पोउपआ(मुख्या)/मॅरेथॉन स्पर्धा/वाह./अधिसुचना/ ८२८ /२०२४ दि. ०२/१२/२०२४

**१२ वी वसई-विरार शहर महानगरपालीका व वसई तालुका कला क्रिडा मंडळ यांच्या सयुंक्त विद्यमाने राष्ट्रीय वसई-विरार महानगरपालीका मॅरेथॉन स्पर्धासाठी येणा-या स्पर्धकांमूळे वाहतूक कोंडी होऊ नये याकरीता वाहतूक नियंत्रण अधिसूचना**

---

**ज्याअर्थी** वसई वाहतूक विभागाचे प्रभारी पोलीस निरीक्षक यांनी त्यांचेकडील जा.क्र. ७४०/२०२४, दि. २९/११/२०२४ अन्वये व विरार वाहतूक विभागाचे प्रभारी पोलीस निरीक्षक यांनी त्यांचेकडील जा.क्र. १४९१/२०२४, दि. २८/११/२०२४ अन्वये आमचे असे निदर्शनास आणुन दिले आहे की, **१२ वी वसई-विरार महानगरपालीका मॅरेथॉन ४२.१९५ किमी व इतर शालेय स्पर्धांचे आयोजन रविवार दि. ०८/१२/२०२४ रोजी सकाळी ०५.३० वा. पासून नवीन विवा कॉलेज विरार (प.) येथुन होणार आहे.** यामुळे मॅरेथॉन मार्ग ठिकाणी वाहतूक नियोजन न केल्यास मॅरेथॉन स्पर्धेकरिता सहभागी होणा-या स्पर्धाकामूळे, स्पर्धा पाहण्यासाठी बाहेरुन येणा-यांची गर्दी आणि त्यांची अस्ताव्यस्त पार्कीग होणारी वाहने यामुळे बाजूचे रस्ते व नाक्यावरील वाहतूक प्रभावीत होऊन मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होण्याची दाट शक्यता आहे. संभाव्य वाहतूक कोंडी व यामुळे शहरातील वाहन चालक, स्थानीक नागरीक यांना होणारा त्रास, प्रवासाचा विलंब टाळण्यासाठी **वसई-विरार महानगरपालीका मॅरेथॉन ४२.१९५ कि.मी** स्पर्धचे ठिकाणी येणारी वाहने पर्यायी मार्गाने वळवून वाहनांच्या पार्कींगबाबत वाहतूक नियोजन करणे आवश्यक आहे.

**ज्याअर्थी वसई-विरार महानगरपालीका मॅरेथॉन** ४२.१९५ किमी स्पर्धा नवीन विवा कॉलेज या ठिकाणी होणार असून त्याकरीता पुर्ण मॅरेथॉन (४२.१९५ कि.मी.) स्पर्धेचे आयोजन नवीन विवा कॉलेज, विरार (प.) येथे, **अर्ध मॅरेथॉन (२१.०९५ कि.मी.) स्पर्धेचे आयोजन व्हिक्टर हाईट्स बिल्डींग जी.जी.कॉलेज मैदानासमोर वसई (प.)** येथे, आणि १० कि.मी. मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन नवीन विवा कॉलेज विरार (प.) येथे व ५ कि.मी. मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन नवीन विवा कॉलेज पश्चिम येथुन आयोजित करण्यात आलेले असुन या तीनही मुख्य स्पर्धाच्या व इतर स्पर्धांचा फिनीश पॉईंट नवीन विवा कॉलेज विरार (प.) असणार आहे. त्या कालावधी करिता सदरचा मार्ग "नो पार्कींग" झोन म्हणून घोषीत करणे व सदर मार्गावरुन येणारी वाहतूक ही पर्यायी मार्गाने वळवणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

**त्याअर्थी** मी सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या वाहतूक विभागाचा पोलीस उप आयुक्त म्हणून शहरातील रस्त्यांवर वाहतूक कोंडी होऊ नये व अपघात होऊ नये यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (१)(ब) प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

नवीन विवा कॉलेज विरार (प.) या ठिकाणी **१२ वी वसई-विरार महानगरपालीका मॅरेथॉन स्पर्धा-२०२४** होणार असून सदर स्पर्धाच्या कालावधीमध्ये वाहतूक कोंडी व अपघात होऊ नये याकरीता स्थानीक नागरीकांची व अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळता सर्व वाहनांना **दिनांक ०८/१२/२०२४ रोजी पहाटे ०५.०० वा. ते दुपारी १३.०० वाजेपर्यंत खालीलप्रमाणे निर्बंध घालण्यात येत आहेत.**

**सर्वेक्षणाप्रमाणे सार्वजनिक रस्त्यांवर खालील प्रमाणे निर्बंध घालावयाचे आहेत .**

१. **पुर्ण मॅरेथॉन (४२.१९५ कि.मी.)**

पुर्ण मॅरेथॉन (४२.१९५ कि.मी.) स्पर्धा ही नवीन विवा कॉलेज विरार (प.) येथुन सुरु होवुन तिरुपतीनगर- जकात नाका-म्हाडा कॉलनी रोड वरील नवीन मनपा चौक येथुन यु टर्न- जकात नाका-बोळींजनाका, पाटील आळी, करमाळे, उमराळे चर्च-चक्रेश्वर तलाव-हेगडेवार चौक-समेळपाडा- सिवीक सेंटर जंक्शन- नालासोपारा रेल्वे ब्रिजवरुन पुर्वकडे टाकीरोड सिग्नलवर युटर्न- तुळींज ब्रिज खालुन डावे वळण- आचोळे रोड चंदननाका- आचोळे क्रॉस रोड- मार्टीन कॉम्पलेक्स-फायरब्रिगेड चौक -वसंतनगरी ग्राऊंड- करोल बँक-वसंतनगरी सर्कल-टी जंक्शन- वाय जंक्शन वसई स्टेशन रोड-वसई ओव्हर ब्रिजवरुन पश्चिमेकडे-डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक (पंचवटी नाका)-अंबाडीरोड-माणिकपुर नाका-वसई माणिकपुर रोड-बाभोळा नाका-पापडी नाका-तामतलाव नाका-चिमाजी आप्पा मैदान-जी.जी.कॉलेज-व्हिक्टर हाईट्स-तहसील कार्यालय-पारनाका-बस डेपो मार्गे-चिमाजी आप्पा मैदान-तामतलाव नाका-पापडीनाका-बाभोळा नाका-माणिकपुर नाका-अंबाडीरोड-डॉ.बाबासाहेब आबेडकर चौक (पंचवटीनाका)-वसई ओव्हर ब्रिजवरुन पुर्वेकडे वाय जंक्शन-टी जंक्शन-वसंतनगरी मेनगेट-वसंतनगरी सर्कल-वसंतनगरी ग्राऊंड-फायर ब्रिगेड स्टेशन चौक- मार्टीन कॉम्पलेक्स, आचोळे क्रॉस रोड, चंदननाका-आचोळे रोड तुळींज ओव्हर ब्रिज खालुन उजवे वळण-टाकीरोड सिग्नल युटर्न-नालासोपारा रेल्वे ब्रिजवरुन पश्चिमेकडे-सिवीक सेंटर,समेळपाडा-हेगडेवार चौक-चक्रेश्वर तलाव-उमराळे चर्च-करमाळे-पाटील आळी-बोळींजनाका-गोकुळ टाऊनशिप-मुलजीभाई मेहता स्कुल-राजीव चौकातुन उजवीकडे-विजय वल्लभ हॉस्पीटल-तिरुपती नगर-नवीन विवा कॉलेज विरार (प.) पर्यंत असा असणार आहे.

२. **अर्ध मॅरेथॉन (२१.०९५ कि.मी.)**

अर्ध मॅरेथॉन (२१.०९५ कि.मी.) स्पर्धा हा रुट व्हिक्टर हाईट्स परिसर-पंचायत समिती रोड-पारनाका-वसई बस डेपो मार्ग-तामतलाव नाका-पापडीनाका-वसई स्टेशनरोड-बाभोळा नाका-वसई माणिकपुर नाका-नवघर अंबाडी रोड पोलीस चौकी-अंबाडी रोड-डॉ.बाबासाहेब आबेडकर चौक (पंचवटीनाका)-वसई ओव्हर ब्रिजवरुन पुर्वेकडे-वसंतनगरी मेनगेट-वसंतनगरी सर्कल-वसंतनगरी ग्राऊंड-फायर ब्रिगेड स्टेशन-बँक ऑफ इंडिया-आचोळे रोड पुर्व-नालासोपारा रेल्वे ब्रिजवरुन पश्चिमेकडे-समेळपाडा-हेगडेवार चौक-चक्रेश्वर तलाव-उमराळे चर्च-पाटील आळी-बोळींजनाका-गोकुळ टाऊनशिप -मुलजीभाई मेहता स्कुल-राजीव चौकातुन उजवीकडे-विजय वल्लभ हॉस्पीटल-तिरुपती नगर-नवीन विवा कॉलेज पर्यंत असा असणार आहे.

३. **१० कि.मी.स्पर्धा (टाईम रन) व १० कि.मी.स्पर्धा (पुरुष) पालघर जिल्हा मर्यादित स्पर्धा**

१० कि.मी.स्पर्धा (टाईम रन) व १० कि.मी.स्पर्धा (पुरुष) स्पर्धा ही नवीन विवा कॉलेज येथुन सुरु होवुन तिरुपतीनगर-जकातनाका-म्हाडारोड-विरार नालासोपारा लिंकरोड-एच.पी.पेट्रोल पंप कडुन यु टर्न घेऊन पुन्हा विरार नालासोपारा लिंक रोड, म्हाडा रोड - जकात नाका - तिरुपती नगर-नविन विवा कॉलेज पर्यंत असा असणार आहे.

पोलीस उप आयुक्त (मुख्या.) मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

४. ५ कि.मी.स्पर्धा (टाईम रन) व ०५ कि.मी.स्पर्धा (महिला) पालघर जिल्हा मर्यादित स्पर्धा

०५ कि.मी.स्पर्धा (टाईम रन) व ०५ कि.मी.स्पर्धा (महिला) स्पर्धा ही नवीन विवा कॉलेज येथुन सुरु होवुन तिरुपतीनगर-जकातनाका सिग्नल -म्हाडारोड - म्हाडा बिल्डींग ९-डी येथुन यु टर्न घेऊन पुन्हा म्हाडा रोड - जकात नाका - तिरुपती नगर-नविन विवा कॉलेज पर्यंत असा असणार आहे.

**शालेय गटातील स्पर्धा-**

५. २ कि.मी. मुले (शालेय स्पर्धा)

२ कि.मी. शालेय स्पर्धा ही रुट नवीन विवा कॉलेज येथुन सुरु होवुन तिरुपती नगर-जकातनाक सिग्नल- म्हाडा रोड - महानगरपालीका सर्कल रस्त्याच्या डावीकडुन वसई विरार शहर महानगर पालीका मुख्यालय (यशवंत नगर) विरार प. असा आहे.

६. २ कि.मी. मुली (शालेय स्पर्धा)

२ कि.मी. शालेय स्पर्धा ही रुट नवीन विवा कॉलेज येथुन सुरु होवुन तिरुपती नगर-जकातनाक सिग्नल- म्हाडा रोड - महानगरपालीका सर्कल रस्त्याच्या डावीकडुन वसई विरार शहर महानगर पालीका मुख्यालय (यशवंत नगर) विरार प. असा आहे.

७. ३ कि.मी. मुले (शालेय स्पर्धा)

३ कि.मी.शालेय स्पर्धा याचा रुट नवीन विवा कॉलेज येथुन सुरु होवुन तिरुपती नगर-जकातनाक सिग्नल- म्हाडा रोड - म्हाडा बिल्डींग ९-डी येथुन यु टर्न घेऊन महानगरपालीका कार्यालय सर्कल समोरुन वसई विरार शहर महानगरपालीका मुख्यालय (यशवंत नगर) विरार प. असा आहे.

८. ३ कि.मी. मुली (शालेय स्पर्धा)

३ कि.मी.शालेय स्पर्धा याचा रुट नवीन विवा कॉलेज येथुन सुरु होवुन तिरुपती नगर-जकातनाक सिग्नल- म्हाडा रोड- म्हाडा बिल्डींग ९-डी येथुन यु टर्न घेऊन महानगरपालीका कार्यालय सर्कल समोरुन उजव्या बाजुने वसई विरार शहर महानगरपालीका मुख्यालय (यशवंत नगर) विरार प. असा आहे.

९. ५ कि.मी. मुले (शालेय स्पर्धा)

५ कि.मी.शालेय स्पर्धा याचा रुट नवीन विवा कॉलेज येथुन सुरु होवुन तिरुपती नगर-जकातनाक सिग्नल- म्हाडा रोड विरार सोपारा लिंक रोड वरील कंम्फर्ट हेरीटेज येथुन यु टर्न घेउुन पुन्हा त्याच कॅरेजमधन विरारच्या दिशेने महानगरपालीका सर्कलसमोरुन उजव्या बाजुने वसई विरार शहर महानगरपालीका मुख्यालय (यशवंत नगर) विरार प. असा आहे.

१०. ५ कि.मी. मुली (शालेय स्पर्धा)

५ कि.मी.शालेय स्पर्धा याचा रुट नवीन विवा कॉलेज येथुन सुरु होवुन तिरुपती नगर-जकातनाक सिग्नल- म्हाडा रोड विरार सोपारा लिंक रोड वरील कंम्फर्ट हेरीटेज येथुन यु टर्न घेउुन पुन्हा त्याच कॅरेजमधन विरारच्या दिशेने महानगरपालीका सर्कलसमोरुन उजव्या बाजुने वसई विरार शहर महानगरपालीका मुख्यालय (यशवंत नगर) विरार प. असा आहे.

११. ३ कि.मी. जेष्ठ नागरीक ५० वर्षावरील (पुरुष/महिला) स्पर्धा

३ कि.मी. जेष्ठ नागरीक ५० वर्षावरील (पुरुष/महिला) स्पर्धा याचा रुट नवीन विवा कॉलेज येथुन सुरु होवुन तिरुपती नगर- जकातनाका सिग्नल- म्हाडा रोड - म्हाडा बिल्डींग ९-डी येथुन यु टर्न घेऊन महानगरपालीका कार्यालय सर्कल समोरुन वसई विरार शहर महानगरपालीका मुख्यालय (यशवंत नगर) विरार प. असा आहे.

**१२. १ कि.मी. जेष्ठ नागरीक ६० वर्षावरील (पुरुष/महिला) स्पर्धा**

१ कि.मी. जेष्ठ नागरीक ६० वर्षावरील (पुरुष/महिला) स्पर्धा याचा रुट नवीन विवा कॉलेज येथुन सुरु होवुन विजय वल्लभ हॉस्पीटल -तिरुपती नगर सर्कल- यु टर्न घेवुन पुन्हा नविन विवा कॉलेज पर्यंत असा आहे.

**१३. फन रन स्पर्धा –**

फन रन स्पर्धा याचा रुट नवीन विवा कॉलेज येथुन सुरु होवुन विजय वल्लभ हॉस्पीटल -तिरुपती नगर सर्कल- यु टर्न घेवुन पुन्हा नविन विवा कॉलेज पर्यंत असा आहे.

**१४. व्हील चेअर स्पर्धा –**

फन रन स्पर्धा याचा रुट नवीन विवा कॉलेज येथुन सुरु होवुन विजय वल्लभ हॉस्पीटल -तिरुपती नगर सर्कल- यु टर्न घेवुन पुन्हा नविन विवा कॉलेज पर्यंत असा आहे.

## वसई वाहतुक शाखा अंतर्गत हद्दितील रस्ते:-

**प्रतिबंधित मार्ग-**

उपरोक्त विवेचन केलेले १ ते १४ स्पर्धांचे मार्गावर सर्व प्रकारची वाहने किंवा सायकल चालविणेस विहीत कालावधीमध्ये प्रतिबंधित राहील.

**पर्यायी मार्ग-**

वसई विरार शहर महानगर पालीके मार्फत १२ व्या राष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन रविवार दिनांक ०८ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या स्पर्धकांना वाहतुकिचा कुठलाही अडथळा होऊ नये तसेच शहरातील नागरीकांची स्पर्धेमुळे कोणतीही गैरसोय होउ नये याकरिता खालील नमुद पर्यायी मार्गाची माहिती महानगरपालीके मार्फत उपलब्ध करुन देत आहे.

**विरार पुर्व पश्चिम पर्यायी मार्ग-**

आगाशी,अर्नाळा,नंदाखाल,सत्पाळा, या बाजुकडुन येणारी वाहने विरार रेल्वे स्टेशनला व हायवेकडे जाण्यासाठी पर्यायी मार्ग

१. विरार स्टेशन कडे जाण्याकरिता- बोळींज सिडीकेट (कॅनरा बँक) पासुन डाव्या हाताला वळुन पदमावती नगर- रानपाडा तलाव- विनय युनिक- नविन विवा कॉलेज पाठीमागील रोड- पेनिन्सुला हाईट- वाय के नगर- एन एक्स मार्गे- नारंगी बायपास रोड- वर्तक रोड- डोंगरपाडा – विरार रेल्वे स्टेशन दिशने.

२. विरार हायवेकडे जाण्याकरिता - बोळींज सिडीकेट (कॅनरा बँक) पासुन डाव्या हाताला वळुन पदमावती नगर - रानपाडा तलाव - ,विनय युनिक – नविन विवा कॉलेज पाठीमागील रोड, - पेनिन्सुला हाईट - वाय के नगर – एन एक्स मार्गे – नारंगी बायपास रोड - ग्लोबल सिटी रोड - नारंगी रेल्वे फाटक मार्गे हायवेच्या दिशने.

**नालासोपारा पश्चिमेकडुन स्टेशनच्या दिशेने येणारे पर्यायी मार्ग –**

१) शंकर मंदिराकडुन येणारा रोड २) हेगडेवार चौक ३) सिविक सेंटर चौक ४) समेळपाडा मधुन मुख्य रस्त्यावर येणारा रोड ५) डांगे कॉम्पलेक्समधुन येणारा रोड ६) नालासोपारा एस टी डेपो .

**वसई पुर्व/पश्चिमकडे येणारे पर्यायी मार्ग**

१. मुंबई बाजुकडुन वसई बाजुकडे येण्यासाठी बाफाणे ते नायगाव, वसई पापडी/वसई बस डेपो

२. मुंबई बाजुकडुन वसई बाजुकडे येण्यासाठी बाफाणे ते वसई पुर्व एम.आय.डी.मार्ग वसई पुर्व रेल्वे स्टेशनकडे

पोलीस उप आयुक्त (मुख्या.) मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

३. मुंबई-अहमदाबाद बाजुकडुन वसई बाजुकडे येण्यासाठी बाफाणे जुचंद्र मार्गे मधुबन
४. मुंबई-अहमदाबाद बाजुकडुन वसई बाजुकडे येण्या-या वाहनांसाठी बाफाणा फाटा ते नायगाव पुर्वे कडुन नायगाव प. मार्गे उमेळमान, माणिकपुर नाका, स्टेला पेट्रोल पंप
५. पारनाका जंक्शन (वसई गाव) वासळईनाका- देवतलाव- भुईगाव मार्गे, डोंगरी उजवे वळण गास रोड सनसीटी, १०० फुट रोड, अंबाडी रोड पर्यंत
६. वसई प. स्टेशन ते आनंद नगर मार्गे नौपाडा, उमेळमान, नायगाव ब्रिज मार्गे जुचंद्र, बाफाणे फाटा मार्गे मुंबई अहमदाबाद हायवेकडे जातील.
७. पापडी, मुळगाव, खोचीवडे, मरीयम नगर, नायगाव स्टेशन प.

## <u>विरार वाहतुक शाखा अंतर्गत हद्दितील रस्ते:-</u>

### पर्यायी मार्गाची माहिती

वसई विरार शहर महानगर पालीके मार्फत १२ व्या राष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन रविवार दिनांक ०८ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या स्पर्धकांना वाहतुकिचा कुठलाही अडथळा होऊ नये तसेच शहरातील नागरीकांची स्पर्धेमुळे कोणतीही गैरसोय होउ नये याकरिता खालील नमुद पर्यायी मार्गाची माहिती महानगरपालीके मार्फत उपलब्ध करुन देत आहे.

- **विरार पुर्व पश्चिम पर्यायी मार्ग-**

आगाशी,अर्नाळा,नंदाखाल,सत्पाळा, या बाजुकडुन येणारी वाहने विरार रेल्वे स्टेशनला व हायवेकडे जाण्यासाठी पर्यायी मार्ग

- विरार स्टेशन कडे जाण्याकरिता - बोळींज सिडीकेट (कॅनरा बँक) पासुन डाव्या हाताला वळुन पदमावती नगर - रानपाडा तलाव - विनय युनिक - नविन विवा कॉलेज पाठीमागील रोड, - पेनिन्सुला हाईट - वाय के नगर - एन एक्स मार्गे - नारंगी बायपास रोड - वर्तक रोड - डोंगरपाडा - विरार रेल्वे स्टेशन दिशने.
- विरार हायवेकडे जाण्याकरिता - बोळींज सिडीकेट (कॅनरा बँक) पासुन डाव्या हाताला वळुन पदमावती नगर - रानपाडा तलाव - विनय युनिक – नविन विवा कॉलेज पाठीमागील रोड, - पेनिन्सुला हाईट - वाय के नगर – एन एक्स मार्गे – नारंगी बायपास रोड - ग्लोबल सिटी रोड - नारंगी रेल्वे फाटक मार्गे हायवेच्या दिशने.
- **नालासोपारा पश्चिमेकडुन स्टेशनच्या दिशेने येणारे पर्यायी मार्ग -**
  शंकर मंदिराकडुन येणारा रोड २) हेगडेवार चौक ३) सिविक सेंटर चौक ४) समेळपाडा मधुन मुख्य रस्त्यावर येणारा रोड ५) डांगे कॉम्पलेक्समधुन येणारा रोड ६) नालासोपारा एस टी डेपो .

उपरोक्त नमुद स्पर्धेच्या सर्व मार्गावर रविवार दि.०८/१२/२०२४ रोजी सकाळी ०५.०० वा ते १३.०० वाजे पावेतो सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे. वाहन चालक आणि नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी बंद मार्गाचे नजिकच्या पर्यायी मार्गाचा वापर करुन सहकार्य करावे. सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना ही फायरब्रिगेड, रुग्णवाहिका, महसुल विभाग, पोलीस विभाग, तालुका दंडाधिकारी, वसई विरार शहर महानगरपालिकेचे वाहने, मॅरेथॉन स्पर्धेकरीता परवानगी दिलेली वाहने यांना वगळुन इतर सर्व वाहनांना लागु राहणार आहे.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना मी सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार आज दिनांक ०२/१२/२०२४ रोजी माझ्या सही शिक्यानिशी जाहीर करत आहे.

( सुहास बावचे )
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय),
मिरा-भाईंदर, वसई-विरार

**आवश्यक कार्यवाहीकरीता प्रत-**

१. स.पो.आ. वाहतुक, वसई, तुळींज, नालासोपारा व विरार, मिरा-भाईंदर, वसई-विरार.
२. कार्यकारी अभियंता, वसई-विरार महानगरपालीका, वेगमर्यादा, रस्ता बंद व पर्यायी मार्ग दाखवणारे फलक लावून घेणेबाबत.
३. प्रभारी अधिकारी वसई/विरार वाहतूक विभाग, प्रभारी अधिकारी- वसई, माणिकपुर, आचोळे, तुळींज, नालासोपारा,अर्नाळा, बोळींज, विरार पोलीस ठाणे योग्य बंदोबस्त नेमण्यासाठी.
४. जनसंपर्क अधिकारी, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय(अधिसूचना प्रसिद्धीसाठी)
५. व्यवस्थापक - टीएमटी, व्हीव्हीएमसी बसेस, ठाणे राज्य परिवहन बस सेवा.
६. सर्व रिक्षा युनीयन अध्यक्ष – वसई-विरार शहर.
७. अध्यक्ष - टेम्पो चालक/मालक संघटना, वसई-विरार.

**प्रत सस्नेह अग्रेषित –**

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२ व ३, मिरा-भाईंदर वसई-विरार.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर –**

१. मा. पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार.
२. मा. अपर पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार.
३. मा. जिल्हाधिकारी, पालघर.
४. मा. आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका.